दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, शुक्रवार, दि.०६ जून २०२५

**वर्ष : ०४**, अंक : २९५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com







## माझ्या मुलाचे तुकडे करून देऊ नका...वडिलांचा आक्रोश...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, बंगळुरु :** बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आरसीबीच्या विजयाचा जल्लोषा साजरा केला जात होता. विराट कोहली आणि आरसीबीच्या टीमला बघण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली. ही गर्दी इतकी जास्त वाढली की, पोलिसांना गर्दी नियंत्रित करण्यासाठी लाठीचार्ज करावा लागला.

या लाठीचार्जनंतर चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. सुरक्षा रक्षकांनी गर्दी रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना प्रचंड गर्दीसमोर मार्ग सोडावा लागला. या चेंगराचेंगरीचे अनेक फोटो आणि व्हिडीओ हे सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. चिन्नास्वामी स्टेडियमसमोर आता चप्पलांचा ढिगारा पसरला आहे.



हैराण करणारी घटना म्हणजे बाहेर चेंगराचेंगरी झालेली असताना देखील स्टेडियमच्यामध्ये जय्यत कार्यक्रम सुरू होता. या चेंगराचेंगरीमध्ये १ जणांचा मृत्यू झाला तर ३० जण गंभीर जखमी झाली आहेत. सध्या जखमींवर उपचार सुरू असून सरकारकडून मोफत उपचार केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी कालच जाहीर केले. आरसीबी संघाच्या परेडचेही आयोजन करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला.

चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये आपला मुलगा गमावलेल्या वडिलांनी मोठी मागणी करत म्हटले की, माझ्या मुलाचे शवविच्छेदन न करता आम्हाला द्या... त्याचा मृतदेह परत द्या...हे बोलताना वडिलांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. ते पुढे म्हणाले की, माझा एकच मुलगा होता, जो आता राहिला नाहीये. त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून आम्हाला देऊ नका...त्याचा आहे तसा मृतदेह परत द्या...

**अधिकाऱ्यांसमोर वडिलांचा आक्रोश...**

तरूणाचे वडील हे अधिकाऱ्यांना शवविच्छेदन न करता मुलाचा मृतदेह द्या अशी विनंती करत होते. मुलाच्या वडिलांनी हे देखील म्हटले की, तो त्यांना न सांगता चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर पोहोचला होता. पण आता काहीच शिल्लक राहिले नाही. किमान आम्हाला त्याचे अंत्यसंस्कार तरी करून द्या असे वडील म्हणत होते. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या या चेंगराचेंगरीमध्ये ११ जणांचा जीव गेला असून कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

## कासा-सायवन महामार्गाचे रस्ता रुंदीकरण अर्धवट, नियोजनशून्य कामामुळे प्रवाशांचे हाल..

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५ कासा (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि वाहतुकीच्या दृष्टिकोनातून गजबजलेला असलेला कासा-सायवन-उधवा-तलासरी-संजान हा प्रमुख मार्ग सध्या रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे अक्षरशः धोकादायक बनला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली सुरू असले तरी, नियोजनशून्यता, निष्काळजीपणा आणि ठेकेदार कंपनीचा मनमानी कारभार यामुळे स्थानिक ग्रामस्थ, प्रवासी व वाहनचालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

**खोदलेले रस्ते आणि अपुऱ्या सुरक्षा यंत्रणा**

सध्या या मार्गावरील धरमपूर ते सायवन दरम्यानचा रस्ता पूर्णपणे खोदलेला असून, त्या ठिकाणी कोणतेही सूचना फलक, अपघात प्रतिबंधक फलक, रिफ्लेक्टर अथवा मार्गदर्शक व्यवस्था नाही. खोदलेले रस्ते, उंचसखल मातीचे भराव आणि कामाच्या ठिकाणी कोणतीही रचना नसल्याने वाहनचालकांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत आहे. यामुळे दुचाकीस्वार व हलक्या वाहनचालकांचे अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. काही अपघातांमध्ये गंभीर जखमी झालेल्यांचेही वृत्त आहे.



रस्त्याच्या कामाचा नियोजन शून्य असून रस्त्याच्या दुतर्फा खोदल्याने आणि अवकाळी पावसामुळे चिखलमय रस्ता झाला आहे. डांबरीकरणावर सगळीकडे माती पसरल्याने चिखल झाला आहे आणि वारंवार अपघात होत आहेत. तरीही प्रशासन किंवा ठेकेदारी कंपनी याकडे दुर्लक्ष करत आहे. ठेकेदारी कंपनीचे माती भराव करणारे दलाल ग्रामस्थांशी वाद घालत असून प्रवाशांची गैरसोयीबाबत कोणीही विचार करत नाही.

**- सुरेश पाडवी, आदिवासी एकता सेवा संस्था अध्यक्ष**

**अवकाळी पावसामुळे चिखलाचे साम्राज्य**

या अर्धवट कामांमध्ये भर पडली आहे ती सध्या सुरु असलेल्या अवकाळी पावसाची. खोदलेले भाग आणि मातीचा भराव यामुळे रस्त्यावर चिखल साचला असून अनेक ठिकाणी वाहने चिखलात अडकत असल्याचे चित्र आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना संतुलन राखणे कठीण झाले आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय शिगेला पोहोचली असून, दररोजच्या प्रवासात अपघातांची भीती कायम आहे.

**शेतकऱ्यांचे आरोप : बेकायदेशीर भूसंपादन**

या रस्ते कामादरम्यान आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीवर कोणतीही नोटीस न देता, बेकायदेशीरपणे भूसंपादन केल्याचा आरोप स्थानिक शेतकरी वर्गाने केला आहे. ठेकेदार कंपनी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून मूळ रस्त्याच्या आराखड्याच्या पलीकडे जाऊन जेसीबीने शेतीचे बांध फोडण्यात आले, झाडे तोडण्यात आली व मोजमाप न करता जमीन ताब्यात घेण्यात आली, असा आरोप आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रशासन आणि ठेकेदार कंपनीची उदासीनता**

या संपूर्ण परिस्थितीकडे प्रशासन व ठेकेदार कंपनी दोघांचेही जबाबदारी झटकण्याचे धोरण दिसून येत आहे. नागरिकांच्या तक्रारी, ग्रामस्थांची मागणी आणि माध्यमांतून आलेली ओरड यांकडे कोणतेही सकारात्मक पाऊल उचललेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, जर एखाद्याचा जीव गेला, तर जबाबदार कोण? असा थेट सवाल उपस्थित होत आहे

**तत्काळ उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

ग्रामस्थ आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तत्काळ रस्त्याच्या दुतर्फा सूचना फलक लावावेत, रात्रीसाठी रिफ्लेक्टर बसवावेत, अपघातग्रस्त ठिकाणी संरक्षक कठडे व भिंती उभाराव्यात, आणि माती भराव नीट समतल करून सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा. याशिवाय बेकायदेशीररित्या घेतलेली शेतकऱ्यांची जमीन परत करण्यात यावी.

या मागण्या त्वरित मान्य न झाल्यास स्थानिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळ्या निमित्त निघोजला रक्तदान शिबिराचे आयोजन

## आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** गुरुवार दि. ५ जुन २०२५ शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त शुक्रवार दिनांक ६ जून २०२५ रोजी सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजता निघोज येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून शिबिराचे उद्घाटन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते उद्घाटन करणार असल्याची माहिती शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी दिली आहे. शिवबा संघटना, पारनेर तालुका पत्रकार संघ तसेच निघोज ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्यभिषेक दिनाच्या निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून या कार्यक्रमास परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व शिवबा संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थितीत राहणार आहेत.



दरवर्षी शिवबा संघटनेच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, ग्रामअभियान, ग्रामस्वच्छता तसेच अनेक सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असते, या सामाजिक उपक्रमांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असतो. शिवबा संघटना आणि किल्ले दुर्गसंवर्धन समिती या माध्यमातून दरवर्षी पाच ते सहा किल्लूयांची निवड करून तेथे सुद्धा ग्रामअभियान, स्वच्छता अभियान राबवण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीसाठी योगदान दिले त्याची माहिती आजच्या युवकांना होण्यासाठी किल्ला सफर मोहीम अंतर्गत सहलीचे आयोजन करीत एक ऐतिहासिक प्रेरणादायी काम शिवबा संघटना व शिवबा किल्ला दुर्गसंवर्धन समिती करीत आहे.

रक्तदान ही जनसामान्यांची सेवा असून हीच ईश्वर सेवा मानून शिवराज्यभिषेक दिनी रक्तदान करून शिवरायांच्या कार्याला मानाचा मुजरा करूया असे आवाहनही शिवबा संघटनेने केले आहे. ओम ब्लड सेंटर शिरूर, समर्थक क्लिनिकल लॅब निघोज यांचे विशेष सहकार्य असणार आहे. या रक्तदान शिबिरात सहभागी होणाऱ्या युवकांनी शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, अध्यक्ष बबनराव तनपुरे, पदाधिकारी राजूभाऊ लाळगे, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठान अध्यक्ष रवी रणसिंग यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान शिवबा संघटना पारनेर तालुका पत्रकार संघ निघोज ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### सिध्दार्थ भोकरे यांना धमकी देणाऱ्यांना अटक न केल्यास आंदोलनर पत्रकार न्यायासाठी रस्त्यावर उतरतील : संतोष कोरडे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे यांना अज्ञात इसमानी पत्र पाठवून जिवे मारण्याची धमकी दिली. याचा राज्यात सर्व स्तरातून निषेध नोंदविला जात आहे. या अज्ञात इसमांना त्वरित अटक करून कार्यवाही न झाल्यास पत्रकार बांधव खपवून घेणार नाहित व न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरतील असा इशारा राज्य पत्रकार संघाचे पारनेर तालुका सचिव संतोष कोरडे व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पारनेर तालुका उपाध्यक्ष वसंत रांधवण यांनी दिला आहे.

दरम्यान सिंदूर ऑपरेशन च्या यशानंतर बॉलिवूड अभिनेते खान बंधू यांनी पाकिस्तानचा निषेध नोंदवून देशाप्रती आपला अभिमान दाखवायला हवा होता, तेव्हा की पाकिस्तानी अभिनेत्यांनी पुढे येऊन आपल्या देशाप्रती आपले प्रेम दाखविले,असे मत व्यक्त केले होते. या मत व्यक्तव्यानंतर अज्ञात इसमाने निनावी पत्र पाठवून माफी माग नाहीतर तुला उडवून देऊ अशी धमकी दिली. या धमकी पत्रानंतर पत्रकार बांधव संतापले असून संपूर्ण राज्यात निषेध सत्र सुरू झाले आहे. संपूर्ण राज्यात, तालुका, जिल्हास्तरावर निवेदन देऊन धमकी देणाऱ्यास त्वरित अटक करण्यात यावी व सिध्दार्थ भोकरे यांना सुरक्षा पुरविण्याची मागणी होत आहे. मागणी त्वरित पूर्ण न झाल्यास राज्य पत्रकार संघाचे पत्रकार, सदस्य राज्यात रस्त्यावर उतरतील असा इशारा राज्य पत्रकार संघाचे पारनेर तालुका सचिव पत्रकार संतोष कोरडे यांनी दिला आहे.

### वन विभागाच्या पुढाकारामुळे वने व वन्यजीव संरक्षणाला नवे बळ



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर वनवृत्त अंतर्गत वने व वन्यजीव संरक्षण अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी, तसेच मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांवर तातडीने प्रतिसाद मिळावा यासाठी, रामबाग वसाहतीत अत्याधुनिक वन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या नियंत्रण कक्षाला भेट देऊन यंत्रणेची माहिती घेतली.

**टोल फ्री क्रमांक उपलब्ध**

नियंत्रण कक्षाचा टोल फ्री क्रमांक १८००३०३३ हा आहे. सदर कक्षातून चंद्रपूर वनवृत्तातील वनविभागाविषयी माहिती पाहिजे असल्यास ती तात्काळ प्राप्त होते. विभागाच्या कामकाजाविषयी माहिती मिळण्यास मदत होते. तसेच काही तक्रारी असल्यास त्याचे निराकरण देखील या कक्षाच्या माध्यमातून केल्या जाते. नियंत्रण कक्ष उभारणीसाठी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन आदेश निर्गमित झाला होता. आता हा कक्ष स्थापन झाला आहे.

**घटनांची माहिती एकाच ठिकाणी**

'वन नियंत्रण कक्ष' हा चंद्रपूर वनवृत्ताच्या मध्यवर्ती ठिकाणी असून चंद्रपूर वनवृत्तातील घटनांची माहिती एकत्रितरित्या एकाच ठिकाणी साठवून ठेवण्यास मदत होते. या कक्षाच्या माध्यमातून चंद्रपूर वनवृत्त व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सर्व वनकर्मचाऱ्यांसह शासकीय वाहनांचे रियल टाईम लोकेशन मिळते. मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना घडल्यास वनविभागात कार्यरत असलेल्या आर.आर.टी पथकाचा संबंधित विभागाशी समन्वय साधण्यास मदत होते.

**शासकीय वाहनात फॉरेस्ट कन्सोल स्क्रीन**

वन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असते. या कक्षामार्फत वन कर्मचाऱ्यांकरिता फॉरेस्ट कंट्रोल नावाचे अँड्रॉइड अॅप तयार करण्यात आले आहे. हे अॅप हाताळण्यासाठी वनरक्षक ते वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. एखाद्या घटनेची माहिती मिळाल्यास सदर माहिती संबंधित वनरक्षक, वनपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना अॅपच्या माध्यमातून लगेच प्राप्त होते. वन नियंत्रण कक्षाद्वारे शासकीय वाहनांमध्ये सुद्धा फॉरेस्ट कन्सोल स्क्रीन बसविण्यात आले आहे. अधिकारी दौऱ्यात असल्यास त्यांच्या कार्यक्षेत्रात घडणाऱ्या घटनांची माहिती शासकीय वाहनात मिळण्यास मदत होते. वनविभागाच्या या पुढाकारामुळे वने आणि वन्यजीव संरक्षण, तक्रारीचे निराकरण व प्रभावी समन्वय साधण्यास मदत होणार आहे.




## पर्यावरणाचे रक्षक बना, भक्षक नको

**निसर्ग सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करायला समर्थ आहे, निसर्गाचा आनंद घ्यायचा, तो ओरबाडायचा नाही.**
**– महात्मा गांधी**

किती समर्पक शब्दांत महात्मा गांधींनी पर्यावरणाचे महत्त्व आपणास पटवून दिलेले आहे. 'पर्यावरण' म्हणजेच परि + आवरण आपल्या अवतीभवती असलेले डोंगर, दऱ्या, वनस्पती, प्राणी, पाणी, आकाश, भूमी, ऊन, वारा, पाऊस अशा सर्व संबंधित घटकांनी एकत्रितरीत्या जे आवरण निर्माण केले जाते. तेच पर्यावरण आहे. निसर्गाच्या सान्निध्यात माणूस जन्माला येतो. घडतो, आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करतो, त्या निसर्गातील प्रत्येक घटक हा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. यातील एकही घटक जर कमी जास्त झाला त्याचे दूरगामी परिणाम सजीवांवर होतात. सर्व सजीवांचे अस्तित्व हे पर्यावरणावर अवलंबून असते. पर्यावरणाचे संतुलन हा सजीव व निर्जीव वस्तूंचा प्राण आहे. स्थळ बदलले की पर्यावरण बदलते. बदललेल्या पर्यावरणाचा सजीवांवर फार मोठा परिणाम होतो.

अविवेकी, स्वच्छंद, स्वैराचारी आणि सुखलोलूप जीवनशैलीमुळे मानवाने स्वार्थापोटी संपूर्ण जग प्रदूषित केले आहे. जगात निर्माण झालेल्या या वाढत चाललेल्या प्रदूषणाचा फार मोठा परिणाम मानवावर होत आहे. मानवाच्या विकृत वागण्यामुळे अनेक प्रकारच्या प्रदूषणाला आपणास तोंड द्यावे लागते आहे.

बदलत्या पर्यावरण चक्रामुळे पावसाचे दिवस कमी होत चालले आहेत. आजकाल वर्षातून जेमतेम ३० ते ४० दिवस पाउस पडतो. कमी दिवसांत पडणाऱ्या पावसाला प्रचंड वेग असतो. त्यामुळे पडणारा पाऊस तितक्याच वेगाने वाहूनही जातो. तो कमी प्रमाणात जमिनीत मुरतो, त्याचा परिणाम म्हणून भू-जलाची पातळी खाली जाते.

**जल प्रदूषण :** वाढत्या औद्योगिकरणामुळे बरेचसे पाणी दूषित केले जाते. ते दूषित पाणी नदीमध्ये प्रक्रिया न करता सोडले जाते. तळी, नदी, किनाऱ्यावर धार्मिक विधी केले जातात व त्यातील फुले व अन्नपदार्थ नदीमध्ये फेकले जातात. मेडिकल कचरा, मेलेली जनावरे, गणपती उत्सवांतील विसर्जित मूर्ती इत्यादींमुळे नदी प्रदूषित होते. पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे नदीमधील नैसर्गिक स्रोत बंद झालेत. उद्योगातून बाहेर पडणारे प्रदूषित पाणी, पारा, सायनाइड, निकेलयुक्त असल्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार दूषित पाण्यामुळे जगामध्ये दररोज ५००० बालकांचा मृत्यू होत असतो.

**वायुप्रदूषण :** औद्योगिक क्षेत्रामधून फार मोठ्या प्रमाणावर अनेक प्रकारचे वायू हवेत सोडले जातात. प्लास्टिक कचरा, पालापाचोळा इत्यादी वस्तू जाळल्यामुळे हवेत घातक वायूंचे प्रमाण फार वाढले आहे. त्यामुळे मोठ्या शहरात व औद्योगिक वसाहतीमध्ये शुद्ध हवा मिळणे अशक्यप्राय झाले आहे. तसेच सर्व प्रकारच्या वाहनांमधून बाहेर पडणारा वायू हा खूपच घातक ठरत आहे. जुन्या वाहनांची योग्य प्रकारे काळजी न घेतल्यामुळे वायुप्रदूषणामध्ये प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे आपल्या देशात लवकरच ऑक्सिजन देणारे बूथ रस्त्यारस्त्यात बसस्थानकावर, रेल्वेस्थानकावर ठेवावे लागणार आहेत.

**ध्वनी प्रदूषण :** वाहनांचे कर्कश हॉर्न, लग्न व धार्मिक समारंभातील डीजे, लाउडस्पीकर, मोटारसायकलचे नवीन प्रकारचे सायलेन्सर इत्यादी गोष्टींमुळे ध्वनी प्रदूषणामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. त्याचा परिणाम मानवाच्या श्रवणशक्तीवर झाला आहे.

**प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण :** प्लास्टिकच्या अनिर्बंध वापरामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. प्लास्टिक बंदी केलेली असलेली तरी प्रभावी अंमलबजावणी नसल्यामुळे प्लास्टिकचा सर्रास वापर शहरात होताना दिसत आहे. प्लास्टिकच्या पिशव्या, कागद, प्लास्टिक पॅकिंग मटेरियल, या सर्वांमुळे सांडपाण्याचे नाले बंद होतात व शहरामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. प्लास्टिक पिशव्यांतून केरकचरा, खराब झालेले अन्न पदार्थ रस्त्यावर फेकले जातात. भूमी प्रदूषण : रासायनिक खतांच्या वापरामुळे सुपीक जमीन क्षारयुक्त झालेली आहे. तसेच पिकांवर जी रसायनयुक्त कृत्रिम जंतुनाशकांची फवारणी केली जाते, त्यामुळे ती जमीन हळूहळू नापीक होते. त्यामुळे धान्य उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत नाही.

**अंतराळ प्रदूषण :** जगातील अनेक देशांतून माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगासाठी अनेक सॅटेलाइट्स सोडलेले आहेत. बऱ्याचशा सॅटेलाइटचे आयुष्य हे मर्यादित असते, त्यानंतर अनेक वर्षे हे निरुपयोगी सॅटेलाइट भ्रमण करत असतात, कधी कधी ते पृथ्वीवरदेखील आदळतात. त्यामुळे अंतराळामध्ये फार मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते.

# पर्यावरणाची मानवप्राण्याला साद

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**



मित्रांनो, तुम्हां सभोवतालचे वातावरण म्हणजेच हे पर्यावरण. निसर्ग,पर्यावरण या नात्याने मला तुमच्या सोबत आज हितगुज साधायचे आहे.तुमच्यासोबत बोलायचे आहे. माझ्या या पर्यावरणातील जैविक घटकातील तुम्ही सुद्धा एक आहात. माझ्यातील निसर्गनिर्मित गोष्टींमुळे मला निसर्ग सुद्धा म्हटले जाते.माझ्या या पर्यावरणातील अनेक गोष्टी ह्या समस्त प्राणीमात्रांच्या हितासाठी आहे. त्याचप्रमाणे तुम्ही सुद्धा, जगण्यासाठी व जीवन आनंदी करण्यासाठी सुंदर अशा वृक्षवेली, नदी, नाले, सजीव, प्राणी, डोंगरदऱ्या, जमीन ह्या सर्व गोष्टींचा उपभोग केला. करत आहात.व भविष्यातही करत राहावं. पर्यावरणातील ह्या सर्व घटकांचा वापर करत तुम्ही तुमच्या जीवन उपयोगी वस्तू बनवा.उपभोग घ्या व आनंदी राहा. हल्ली मात्र माझ्या स्वास्थाची चिंता वाटते.माझ्यातील सुंदर अशा सृष्टीचा नाश होताना दिसून येत आहे. तुम्ही तुमच्या हितासाठी माझ्या या पर्यावरणातील प्रत्येक गोष्टीचा उपभोग घेताना,मात्र कुठेतरी दूषित होताना दिसून येत आहे या गोष्टींची चिंता वाढते. मानव म्हणून बुद्धी नावाची अलौकिक गोष्ट तुमच्या जवळ आहे. त्या बुद्धीच्या जोरावर विज्ञानाच्या माध्यमातून सुंदर सुंदर असे शोध लावून जीवन सुखकर बनवले आहे मात्र,या सुखी जीवनासाठी माझ्या या सृष्टीतील गोष्टींचा होणाऱ्या नैसर्गिक गोष्टींचा रास होताना दिसून येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार लक्षात घेत असता आज तुम्हाला साद घालायची आहे.

मित्रांनो,माझ्या ह्या पर्यावरणात वृक्षांची हजारो वर्षांपासूनची निर्मिती झाली आहे. तेव्हापासून कित्येक प्रकारचे वृक्ष तुम्हाला सावली देत आहे.सुगंधित फुले, सुमधुर फळे देत आहे.कडुलिंब तुळस, अडूळसा यासारखी औषधी वनस्पती तुमच्या रोगांवर निदान करण्यास मदत करत आहे.अहो एवढेच काय! झाडे वयोवृद्ध झाली. सुकायला लागली व वाळल्यानंतर लाकडांपासून सुंदर अशा कलाकृती तयार करून त्यापासून घरासाठी दरवाजे,खिडक्या,टेबल, खुर्ची,लहान मुलांसाठी खेळण्या, घरगुती उपयोगाच्या वस्तू बनवल्या जातात.तुमचे जीवन सुखकर होण्यास मदत होते म्हणून,आपणास साद अशी की,भलेही तुम्ही, एक झाड लावू नका मात्र, त्यांना तोडू नका. तुमच्यासाठी तुम्ही सिमेंटचे जंगल तयार करत आहात मात्र जंगलात वास्तव्य करणारी वन्यजीव इतरत्र भटकत आहे.त्यांचे निसर्ग अधिवास नष्ट करू नका.या झाडांच्या बिया जमिनीवर पडून पावसाच्या साह्याने परत उगवतात व झाडांपासून अनेक झाड तयार होतात.ही घनदाट वने जंगले निसर्गरम्य वातावरणात तुम्हासाठी प्राणवायू पुरवण्याचे कार्य करतात म्हणून, तुम्हांला साद अशी की, तुम्ही जरी एखादं झाड लावले नाही तरी चालेल मात्र, झाडे तोडू नका.पर्यावरणाची हानी करू नका.

### पर्यावरणाचे संवर्धन करा.

मित्रांनो ! दुसरे असे की,माझ्या या पर्यावरणातील अत्यंत महत्त्वाचा घटक घटक म्हणजे शुद्ध हवा. ही शुद्ध हवा तुमच्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे.शुद्ध हवेतील ताजा असा प्राणवायू तुम्हाला निरोगी जगण्यास मदत करतो म्हणून,तुम्हां तुम्हा साद अशी की,तुमच्या वाढत्या अपेक्षा,गरजा त्यामुळे कारखान्यांची निर्मिती होत आहे व त्यातून विषारी वायू बाहेर पडत आहे.त्यातून हवा दूषित होत आहे तर,ती शुद्ध हवा दूषित करू नका कारण, या जीवसृष्टीतील तुमच्यासारखेच कितीतरी प्राणीमात्रा जगत प्राणवायुवर जगत आहे. त्यांना व तुम्हाला सुद्धा श्वसनाचा त्रास होईल. त्यातून तुम्हालाच श्वसनासंदर्भात आजार होऊन हृदयासंदर्भात आजार होतील म्हणून, सुद्धा हवा दूषित होणार नाही,याची काळजी घ्या.मित्रांनो ! शुद्ध पाणी सगळ्यांनाच हवे असते. शुद्ध पाण्यासाठीतुम्ही अनेक प्रयत्न करता, कारण पाणी हेच जीवन आहे.सर्वांना गावाकडील खळ खळ वाहणारी नदी,नाले, उंचावरून कोसळणारे धबधबे आवडतात. त्यांच्याकडे बघून मन प्रसन्न होते. एवढेच नाही तर, तुम्ही कितीतरी पैसे खर्च करून असे नैसर्गिक नदी, तलाव, धबधबा बघण्यासाठी तुम्ही जाता म्हणून,पर्यावरण निसर्ग या नात्याने अशी साद घालतो की, कारखान्यातून निघणाऱ्या केमिकल युक्त दूषित पाण्याने स्वच्छ,सुंदर नद्या नाले दूषित करू नका.

मित्रांनो ! प्लास्टिकच्या सर्रास वापर होताना दिसून येत आहे. त्यामुळे सुंदर अशा माझ्या या सृष्टीवर प्लास्टिक कचरा साचला आहे.तो कुजत नसल्यामुळे त्याचे खतात रूपांतर होत नाही. त्यामुळे तुमच्याच अवतीभवतीच्या नाले गटार यामध्ये कचरा, घाण साचून दुर्गंधी पसरते. त्याचप्रमाणे भटके प्राणी त्यातील वस्तू खाण्यासाठी गेले असता, या कॅरीबॅग प्लॅस्टिक सह त्यांच्या पोटात जातात त्यामुळे या प्राण्यांचा बळी जाण्याची शक्यता असते. म्हणून प्लास्टिक कचऱ्याचा वापर टाळून सृष्टी सौंदर्य नष्ट करू नका. पर्यावरणाचे रक्षण करा.त्याच प्रमाणे मित्रांनो ! वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शहरे झपाट्याने वाढत आहे त्यामुळे, कितीतरी शेत जमिनी ह्या नॉन अग्रिकल्चर (एन ए )झाल्या आहे. तुमच्या ह्या पैशाच्या हव्यासापोटी प्लॉटिंगच्या व्यवसायामुळे सोन्यासारख्या काळ्या जमिनींना सिमेंटच्या जंगलांनी विळखा घातला आहे. म्हणून काळ्या आईचे, मातीचे संवर्धन करा. त्यात सोन्यासारखे पीक पिकवा यातून,माझ्या ह्या सुंदर अश्या या पर्यावरणाचे नुकसान तर होणार नाहीच त्यातून माझे संरक्षण होईल व जगण्यासाठी धान्य ही मिळेल.

अशाप्रकारे मित्रांनो! मी पर्यावरण, निसर्ग या नात्याने तुम्हाला साद घालतो की,तुम्ही एकही झाड लावू नका.या निसर्गामध्ये, पर्यावरणाच्या या सभोंवतालच्या घटकात एवढी शक्ती आहे की,ते आपोआप उगवतात फक्त तुम्ही ते तोडू नका.तुम्ही कुठलीही नदी स्वच्छ करू नका.मुळात ती प्रवाहशील आहे.ती सतत वाहत राहते. स्वतः स्वच्छ राहते. तुम्ही फक्त तिच्यात घाण टाकू नका. माझ्या या पर्यावारणातील निसर्गनिर्मित घटकाने सुंदर अशा वृक्षवेली,जंगल यातून शुद्ध हवा तयार केली आहे. त्यामध्ये फक्त कारखान्यातून निघणारी दूषित हवा सोडून यातून माझी हानी करू नका. अन हो मी मुळातच शांत आहे तुम्ही शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू करू नका.ती क्षमता निसर्गातील या पर्यावरणाच्या ठायी मुळातच आहे.निष्पाप प्राणी, वन्यजीव यांना मारू नका. जंगले जाळू नका.फक्त तुम्ही मानव म्हणून मानवासारखे वागा.माझ्या या पर्यावरणातील प्रत्येक घटकांवर प्रेम करा. नदी,नाले,डोंगर दऱ्या,काळी माती,पाणी या सर्वांवर प्रेम करा. संत तुकोबांनी तर मलासोयरेम्हटले.

# १८ वर्षाची प्रतीक्षा संपली ; आरसीबीचे ऐतिहासिक जेतेपद!

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची नुकतीच सांगता झाली. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक अंतिम सामन्यात रजत पाटीदारच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने श्रेयस अय्यरच्या पंजाब सुपर किंग्स संघाला सहा धावांनी नमवत पहिल्यांदाच आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरत इतिहास रचला. आरसीबीने अठराव्या वर्षी हे ऐतिहासिक विजेतेपद मिळवून १८ वर्षाची प्रतीक्षा संपवली. गेली १८ वर्ष आरसीबीचे आजी - माजी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि आरसीबीचे चाहते ज्या क्षणाची वाट पाहत होते तो क्षण आला आणि आरसीबीचा महान खेळाडू विराट कोहली भावूक झाला. आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्यावर विराट कोहलीच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. लहान मुलासारखा विराट रडू लागला. कधी जमिनीत तोंड खुपसून तर कधी आपल्या आजी माजी सहकाऱ्यांच्या गळ्यात पडून तर कधी आपल्या पत्नीच्या गळ्यात पडून तो रडू लागला. विराटला इतके भावूक झाल्याचे याआधी कधी पाहिले नाही. मैदानावर नेहमी आक्रमक राहणारा विराट पहिल्यांदाच इतका भावूक झाला आणि त्याने आपल्या आनंदाश्रुंना वाट मोकळी करून दिली. अर्थात हे आनंदाश्रु होते १८ वर्ष पाहिलेले स्वप्न साकार झाल्याचे. हे फक्त आनंदाश्रु नव्हते तर त्यामागे त्याने केलेली मेहनत, जिद्द आणि त्याची हार न मानण्याची वृत्ती. आपल्या संघाला आयपीएलचे विजेतेपद मिळवून द्यायचेच असा चंग त्याने बांधला पण त्यात त्याला यश येत नव्हते. यावेळी मात्र त्याला त्यात यश आले आणि विराट सोबतच मैदानावरील आणि आणि टीव्ही, मोबाईलवर सामना पाहणाऱ्या करोडो क्रिकेट प्रेमींनी एकच जल्लोष केला. जो तो विराट कोहलीचे आणि आरसीबी संघाचे कौतुक करू लागला. घराघरात आणि सोशल मीडियावर आरसीबी संघाचे अभिनंदन करण्याची स्पर्धा सुरू झाली. अर्थात आरसीबी संघांसाठी हे विजेतेपद सोपे नव्हते कारण अंतिम सामन्यात पोहचलेले दोन्ही संघ हे तुल्यबळ होते.



दोघांनीही साखळी सामन्यात चांगली कामगिरी करून पॉईंट टेबलवर पहिले आणि दुसरे स्थान पटकावले होते त्यामुळे अंतिम सामना रंगतदार होणार यात कोणालाही शंका नव्हती. पहिली फलंदाजी करताना आरसीबीने अपेक्षेप्रमाणे चांगली फलंदाजी करत १९० धावा काढल्या. विराट कोहली, रजत पाटीदार, जितेश शर्मा यांनी चांगली फलंदाजी केली मात्र पंजाबच्या गोलंदाजांनी त्यांना २०० धावा काढून दिल्या नाहीत. अर्शदीप सिंग आणि काईल जेमिन्सन यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. १९१ धावांचा पाठलाग करताना पंजाबने चांगली सुरुवात केली प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी चांगली सलामी दिली दोघांनीही पहिल्या गाड्यांसाठी ४३ धावा काढल्या. जॉस इंग्लिसने २३ चेंडूत ३९ धावा काढून सामन्यात रंगत आणली मात्र श्रेयस अय्यर पुन्हा एकदा आरसीबी विरुद्ध फ्लॉप ठरला. अवघी १ धाव काढून तो माघारी फिरला. तिथेच सामना आरसीबीच्या बाजूने झुकला. अखेरच्या षटकात नेहाल वढेरा आणि शशांक सिंग यांनी झुंज दिली पण ती अपुरी ठरली. पंजाबचा संघ १८४ धावाच काढू शकला आणि आरसीबीने सहा धावांनी विजय मिळवला. आरसीबीच्या या विजयात त्यांच्या गोलंदाजांचे मोलाचे योगदान होते. त्यांनी अतिशय शिस्तबद्ध मारा केला. भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पांड्याने प्रत्येकी दोन बळी घेतले.त्यांच्या अचूक माऱ्याने पंजाबच्या फलंदाजांना वेगाने धावा काढता आल्या नाहीत. कृणालाने तर चार षटकात अवघ्या सतरा धावा देत दोन गडी बाद केले म्हणूनच त्याला प्लेअर ऑफ द मॅच हा पुरस्कार देण्यात आला. आरसीबीच्या इतर गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली आणि आपल्या संघाला विजयी करत संघातील खेळाडूंसह चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी निर्माण करून दिली.

**ऐतिहासिक विजेतेपद मिळवणाऱ्या आरसीबी संघाचे मनापासून अभिनंदन!**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## प्रत्यक्ष...

सेल लॅपटॉप जागी
पुस्तकशोभते हाती
तंत्र युगात नवा मंत्र
जुळतीलं नवी नाती

सर्च करताचं गुगल
त्वरे इप्सित माहिती
सगळेसादर रेडीमेड
एआयची महामहती

बुध्दीव्यायाम सरला
कशाले स्मरण शक्ती
ना आठवणसाठवण
आळस तुंबला रक्ती

कॅल्क्युलेशन हरवले
मागास झाले गणिती
विचार शक्ती खुंटली
नवमुढांत होई गणती

एकक्लिक रेखाटेसर्व
न हस्तकलाचित्रकृति
लयास चालली कला
सतावते भयाण भिती

सुसाट सादृश्य प्रगति
सुस्तावली मेंदूचीगति
माणूसपण लुप्तझाले
जगे मशीनच्या संगती

निर्मिले रोबोटआपण
करी राज्य मनावरती
गुलामी सुवर्णशृंखला
बुध्दीभोवतीफेरधरती

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# वाचक पत्र

## अपात्र बहिणींना वाटलेला पैसा वसूल केला जावा !




'माझी लाडकी बहीण योजने'साठी आलेले अर्ज पडताळण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने सरकारी नोकरी असलेल्या, वार्षिक उत्पन्न अडीच लाखाहून अधिक असलेल्या आणि चारचाकी गाडी असलेल्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतला. या योजनेचा लाभ सर्वांनाच देण्याची चूक झाली अशी कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात दिली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात न बसणाऱ्या ज्या महिलांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांना दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत तसेच त्यांच्यावर कारवाईही केली जाणार नाही असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. निवडणूका अगदी तोंडावर आल्याने आलेल्या अर्जांची छाननी निकषानुसार करण्यासाठी पुरेसा वेळा नव्हता असे विधान करून पवार यांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महिलांच्या भावना मिळण्यासाठीच या योजनेचा वापर करून घेतला हे स्पष्ट होते. माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महायुती सरकारला निवडणुकांत मोठ्या प्रमाणात मिळाला असे राजकीय तज्ज्ञांनीही निवडणुकांच्या निकालानंतर स्पष्ट केले होते. या योजने अंतर्गत जो पैसा राज्यातील माता भगिनींना प्रतिमाह दिला जाणार होता तो महायुतीतील घटक पक्षांच्या तिजोरीतून नव्हे, तर सरकारी खजिन्यातून दिला जाणार होता. सर्वसामान्य नागरिक दिवसभर राब राब राबून महिन्याला जे वेतन कमावतो त्या वेतनातून कररूपाने पैसा सरकारी खजिन्यात जमा होत असतो. या जनतेच्या घामातुन आलेल्या पैशाचा विनियोग योग्य रीतीनेच व्हायला हवा. त्यासाठी योग्य नियोजन करण्याचे काम सरकारचे असते. मात्र माझी लाडकी बहीण योजना अमलात आणताना सरकारमधील घटक पक्षांनी केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा पैसा कोणतीही छाननी न करता मुक्त हस्ताने वाटला, त्यामुळे सरकारला जो कोट्यवधी रुपयांचा फटका बसला आहे तो उत्तरदायी मंत्री महोदयांनी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या खिशातून द्यायला हवा. या योजनेसाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात बसणाऱ्या महिलांनीच खरेतर योजनेसाठी अर्ज करणे अपेक्षित होते; मात्र सरकारी सेवेत गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या, घरात मोलकरीण ठेवणाऱ्या, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या महिलांनीही या योजने अंतर्गत अर्ज करून या योजनेचा गैरफायदा घेतला. ही केवळ सरकारचीच फसवणूक नसून देशाच्या विकासासाठी आपल्या मिळकतीमधून कररूपाने सरकारला धन देणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकाची फसवणूक आहे, त्यामुळे अशा महिलांवर कारवाई करून त्यांच्याकडून दंडासहित रक्कम वसूल करायला हवी. जनतेची आणि सरकारची फसवणूक करणाऱ्या महिलांचे लाड सरकारने का करावेत ? आजमितीला ही योजना राबवणे सरकारलाही डोईजड झाले आहे. ही योजना चालू ठेवण्यासाठी सरकारला अन्य योजनेसाठी संरक्षित केलेला निधी वापरावा लागत आहे, योजना सुरु करण्याआधीच आलेल्या अर्जाची नीट छाननी केली असती तर सरकारवर आज ही वेळ आली नसती.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई, ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## श्रमिक महिला सेवाभावी संस्था वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०५, धाराशिव :** धाराशिव येथील श्रमिक महिला सेवाभावी संस्था, रामनगर या संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात दहावी बोर्ड परीक्षेत कु.उत्कर्ष अनिल मुडे, आर्यन नितीन चंदनशिवे यांनी दहावी बोर्ड परीक्षेत ९७% गुण मिळवून यश प्राप्त केल्याबद्दल या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार श्रमिक महिला सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा अनिता तोडकर यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित महिला उज्वला मुंडे, निता बळवंत, कल्पना माळी, शिला आकोसकर, कोमल महाजन, गितांजली तोडकर, शैला वाघमारे यांच्यासह इतर महिलांनी उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप टाकत अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुंडे महाविद्यालयात डॉ.वाल्मिक परहर यांची 'प्रभारी प्राचार्य' पदी नियुक्ती



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०५, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेच्या वतीने डॉ. वाल्मिक दगडू परहर यांची प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपप्राचार्य म्हणून डॉ. विष्णु सर्जेराव जायभाये यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. वाल्मिक परहर यांनी 'प्रभारी प्राचार्य' पदाचा कार्यभार स्वीकारुन आपल्या कामकाजास सुरुवात केली आहे. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मवीर दादा इदाते, कार्याध्यक्ष श्री. श्रीराम इदाते, प्राचार्य डॉ. राहूल जाधव, डॉ. विष्णु जायभाये, ग्रंथपाल दगडू जगताप हे उपस्थित होते. नियमित प्राचार्य डॉ. राहूल जाधव हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांनी आपल्या प्राचार्य पदाचा कार्यभार नवनियुक्त प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांचेकडे दिला आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. राहूल जाधव व वाणिज्य विषयाचे सहायक प्राध्यापक डॉ. रामदास देवरे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेबाबत संस्था व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच डॉ. वाल्मिक परहर यांची प्रभारी प्राचार्य पदी तर डॉ. विष्णु जायभाये यांची उपप्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल संस्था व महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## पार्वतीबाई बिडवे उर्फ 'नानी' यांचे दुःखद निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, सिन्नर :** नाशिक जिल्ह्यातील सिन्नरमधील नाभिक समाजातील जेष्ठ महिला गं.भा. पार्वतीबाई शंकर बिडवे उर्फ नानी' यांचे दि.३ रोजी रात्री २. ३० वाजता अल्पशा आजारात वृद्धपकाळाने त्यांच्या सिन्नर मधील राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९४ वर्षाच्या होत्या. बुधवार दि.४ जुन रोजी सिन्नरच्या संगमनेर नाका येथील वैकुंठ धाम मध्ये सकाळी ११ वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी स्थानिक समाज बांधवांसह अहिल्यानगर, पुणे आणी नाशिक जिल्ह्यातील बहुसंख्य नातेवाईक, सगे सोयरे उपस्थित होते.

प्रामुख्याने नाशिक, पुणे, संभाजीनगर आणि अहिल्यानगर जिल्ह्यात अग्रगण्य असलेल्या नाभिक समाजाच्या बिडवे परिवारातील कै. पार्वतीबाई उर्फ नानी या कै.ह.भ.प. शंकरराव विठोबा बिडवे यांच्या पत्नी तर जेष्ठ नाभिक समाजसेवक कै. केशवराव बिडवे,उद्योजक कै. उत्तमराव बिडवे आणि ज्ञानेश्वरराव बिडवे यांच्या मातोश्री होत्या.

## पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांची उल्लेखनीय कामगिरी




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५ डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील कासा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात दाखल झालेल्या एका गंभीर गुन्ह्याचा यशस्वी तपास करून आरोपींना अटक केल्याबद्दल पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांना पोलिस अधीक्षक कार्यालय, पालघर यांच्याकडून गौरवण्यात आले आहे. कासा पोलीस ठाणे गु.र.नं. ६८/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०९ व ६१(२) अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास अत्यंत कसोशीने करत श्री. मांदळे यांनी आरोपींचा शोध लावून त्यांना अटक केली. हे प्रकरण गुन्हेगारी स्वरूपाचे असून समाजाच्या शांततेला बाधा पोहोचविणारे होते. अशा गुन्ह्यांमध्ये तपास करणे हे आव्हानात्मक असते, परंतु श्री. मांदळे यांनी आपल्या अनुभव, तांत्रिक कौशल्य व चिकाटीच्या जोरावर हा तपास फत्ते केला. या त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना पोलीस अधीक्षक श्री. यतीश देशमुख (भा.पो.से.) यांनी प्रशस्ती पत्रक देऊन गौरविले आहे. श्री. देशमुख यांनी मांदळे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना सांगितले की, अविनाश मांदळे यांनी दाखविलेली तत्परता, दक्षता आणि चिकाटी ही महाराष्ट्र पोलीस दलाच्या उज्वल परंपरेशी सुसंगत आहे. त्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे कार्य करत राहावे, अशी अपेक्षा आहे.

सदर कामगिरीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये पोलीस दलाबद्दल विश्वास दृढ झाला असून, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची पावले मानली जात आहेत.

# ठाणे जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम...

### ४४९० नागरिकांची तपासणी; २३७ संशयित रुग्णांची नोंद



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार व सहजसुलभ करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबवली जात आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात कर्करोग मोबाइल व्हॅन कार्यरत असून, नागरिकांना कर्करोग तपासणीसाठी सुविधा उपलब्ध होत आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली या व्हॅनचे प्रभावीपणे संचालन केले जात आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोबाइल व्हॅनद्वारे मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग यांसारख्या प्रमुख कर्करोगांची तपासणी केली जात आहे. ही व्हॅन आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून, ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना प्राथमिक तपासणीसाठी रुग्णालयात न जाता त्यांच्या परिसरातच ही सेवा मिळते.

फेब्रुवारी २०२५ व मे २०२५ या दोन महिन्यातील कालावधीत एकूण ४४९० नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये २३७ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. या संशयित रुग्णांना पुढील निदान व उपचारासाठी संबंधित आरोग्य संस्थांकडे पाठविण्यात आले आहे.

कर्करोग हा असंसर्गजन्य आजार असून त्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परंतु वेळीच निदान झाल्यास योग्य उपचाराद्वारे रुग्णाचे आयुष्य वाचवता येते. याकरिता कर्करोग मोबाइल व्हॅन उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

## लोणंद बसस्थानक परिसरात डबकीच डबकी... प्रवाशांना करावी लागतीय चांगलीच कसरत...





अक्षराज : बाळू धायगुडे
दि.०५, खंडाळा (सातारा)

## 'एशियन एल्बो बॉक्सिंग स्पर्धेसाठी' रायगडच्या खेळाडूंनची निवड



**अक्षराज : कामेश कदम**

**दि.०५, पेण (रायगड) :** एशियन एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट फेडरेशन आणि एल्बो बॉक्सिंग इंडिया असोशिएशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६,७,८ जुन २०२५ रोजी पद्म एंनडोअर स्टेडियम गोवा माप्सा येथे पहीली दक्षिण एशियन एल्बो बॉक्सिंग स्पर्धेचे चे आयोजन डॉ.मंदार पनवेलकर सर चेअरमन एल्बो बॉक्सिंग फेडरेशन, सुरेश कोळी, अध्यक्ष एल्बो बॉक्सिंग असोशिएशन इंडिया ह्यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात येणार आहेत.

ह्या स्पर्धेसाठी पेण रायगड येथे रायगड भुषण रविंद्र म्हात्रे, पप्पु सर ह्यांच्याकडे पेण तालुका क्रिडा संकुल येथे एल्बो बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थेन मधील दर्श कैलास धावडे, रुद्रेश प्रथमेश पाटील, पार्थ हर्षवर्धन शहासने, अनुज रणपिसे,मोहीत परशुराम कोठेकर, निशिगंध संतोष पाटील, आर्यन निलेश म्हात्रे, स्वरांगी नचिकेत घैसास, रितुल रविंद्र म्हात्रे ह्याची निवड करण्यात आली आहे. ह्या स्पर्धात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन, रायगड जिल्हा एल्बो बॉक्सिंग असोशिएशन, महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंग असोशिएशन ह्यांच्या तर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

## आयुकांच्या नेतृत्वखाली धोकादायक इमारतीच्या सुरक्षेचा आढावा



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जुन्या व धोकादायक इमारत घोषित करण्याकरिता निर्णय घेण्यास अडचण निर्माण झाल्यास अशा प्रकरणात निर्णय घेण्यासाठी मा. उच्च न्यायालय रीट याचिका क्रमांक ११३५/२०१४ मधील निर्णयानुसार संदर्भिय आदेशान्वये अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन Tenchical Advisory Committee स्थापना करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १० जुन्या व धोकादायक इमारतीच्या बाबतीत दोन बांधकाम अभियंता यांचेकडून दोन भिन्न संरचनात्मक अहवाल प्राप्त झाला असून सदरचे प्रकरण Tenchical Advisory Committee कडे सोपवण्यात आले असून या जुन्या व धोकादायक इमारतीची स्थळ पाहणी दि. ०३/०६/२०२५ रोजी करण्यात आली होती. या स्थळ पाहणी दरम्यान खालील नमूद केलेल्या इमारतींची पाहणी करण्यात आली.

**प्रभाग समिती क्र.**

**इमारत व घराचे नाव, पत्ता**

श्री आशीर्वाद को-ऑपरेटिव हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड
डिमेलो हॉटेल, स्टेशन भाईंदर (पश्चिम,)
न्यू पल्लवी को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी,
६० फूट रोड भाईंदर पश्चिम)
जोसेफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड,
६० फूट रोड भाईंदर पश्चिम)
मालिका को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड,
६० फूट रोड भाईंदर पश्चिम)
न्यू गिरनार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड
६० फूट रोड भाईंदर पश्चिम)

लक्ष्मी दिप को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड
सिनेमॅक्स जवळ, कनकिया रोड,
मिरा रोड (पूर्व)
लक्ष्मी आशिष को-ऑपरेटिव हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड
लक्ष्मी पार्क, कनकिया रोड मिरा रोड (पूर्व)
बैतूल अब्बास को-ऑपरेटिव हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड
हैदरी चौक नयानगर मिरारोड (पूर्व)
२ / २
फातिमा मंजिल को-ऑपरेटिव हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड
मिरा निर्सिंग होम गल्ली, नयानगर,
मिरारोड (पूर्व)
शितल प्लाझा
शितल नगर, मिरारोड (पूर्व)

सदर स्थळ पाहणी दरम्यान मा. आयुक्त यांनी संबंधित इमारतीचे भोगवटाधारक यांच्याशी संबंधित विषयावर चर्चा करून त्यांचे मत जाणून घेतले.तसेच Tenchical Advisory Committee चे अधिकारी आणि मनपा अभियंता यांना सदर जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे अहवाल तातडीने सादर करणे बाबत सूचना केल्या. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामार्फत, जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत तांत्रिक सल्लागार समिती मधील Tenchical Advisory Committee अधिकारी उपस्थित होते.

## महावितरणच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त विंचूर येथे निबंध व चित्रकला स्पर्धा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.५, विंचूर (नाशिक) :** गुरुवार दि.५ रोजी विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त लासलगाव उपकेंद्र विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी विंचूर विद्यालयात साधारण ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आणि पर्यावरण दिनानिमित्त शाळेत व विंचूर उपकेंद्र येथे वृक्षारोपण ही करण्यात आले.

या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात ०१ ते ०६ जून २०२५ दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी विंचूर येथे किरण काकड (सहाय्यक अभियंता), नंदकुमार देवढे (क भा पा विद्यालयाचे प्राचार्य), दिव्या पवार (कनिष्ठ अभियंता), दिनेश सिंग राजपूत (सहाय्यक अभियंता), नितीन निकम (कनिष्ठ अभियंता), प्रदीप भालेराव (कनिष्ठअभियंता), अरुण चोथमल (लिपिक लेखा), दिपाली देवरे (लिपिक लेखा) अवधूत मोरे (लिपिक मा.स.) वैभव दरेकर (बाह्य स्रोत तंत्रज्ञ), प्रवीण सपकाळ (शिपाई) व पत्रकार सुनील क्षिरसागर व रोहन सरोदे आणि स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थिनी, आदी उपस्थित होते.

# कांदा बियाण्याची यंदा तुटवडा भासण्याची शक्यता



२ वर्षांपूर्वी कांदा बियाणे उत्पादन अधिक झाले होते. त्यामुळे बियाणे मातीमोल किमतीने विकावे लागले. त्यामुळे गतवर्षी व यंदा कांदा बियाण्यांच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांना पाठ फिरवली. शिवाय बियाणांचे उत्पादनही ३० टक्क्यांनी कमी झाले. त्यामुळे बियाणे चंटाईला सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना भेसळयुक्त बियाणांपासून सावध रहावे लागणार आहे.

**– योगेश पायमोडे, कांदा उत्पादक शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

आम्ही दर वर्षी कांदा बिजोत्पादन घेतो. शेताच्या बाजूला असलेल्या स्वतंत्र शेतजमीनीत बीजोत्पादन घेतल्याने बियाणे दर्जेदार तयार झाले आहे. मात्र दर वर्षीच्या तुलनेत यंदा उत्पादन कमी निघाले आहे. यंदा कांदा बियाण्याला अधिक मागणी असल्याचे दिसून येते आहे.

**– शिवाजी चौरे, कांदा बीजोत्पादन शेतकरी, वडगाव सावताळ, ता. पारनेर**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** २ वर्षांपूर्वी तसेच गत वर्षी कांदा बियाण्यांना मातीमोल दर मिळाल्याने बियाणे उत्पादनातील कल कमी झाला आहे. त्याचा परिणाम यंदा कांदा बियाणे उपलब्धतेवर होताना दिसत आहे. दर वर्षीच्या तुलनेत यंदा ३० टक्के बियाणे उत्पादन कमी झाल्याने बियाणांच्या तुटवड्याला सामोरे जावे लागणार असल्याचा अंदाज कांदा उत्पादकांचा आहे.

अहिल्यानगर, नाशिक, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगरसह मराठवाडा, विदर्भातील अनेक जिल्ह्यांत कांदा उत्पादन घेतले जाते. अनेक शेतकरी स्वतः तयार केलेले बियाणेच वापरतात, शिवाय अन्य शेतकऱ्यांनाही विक्री करतात. दोन वर्षांपूर्वी शेतकरी तसेच बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात बियाणे उत्पादन केले होते.

यंदा नैसर्गिक वातावरणातील परिणामामुळे बियाणांच्या उत्पादनातही घट झाल्याचे बीजोत्पादन घेणारे शेतकरी सांगतात. बियाणे चढ्या दराने घ्यावे लागेल. शिवाय बियाणांची गुणवत्ता कमी, बियाणात भेसळ, जुने बियाणे असल्यास उगवण क्षमता कमी अशा अडचणींना सामोरे जावे लागणार असल्याने बियाणे खरेदी करताना दक्ष राहावे लागणार असल्याचे कांदा पीक अभ्यासक वैभव गोल्हार यांनी सांगितले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून दरवर्षी कांदा बियाण्यांचे उत्पादन घेतले जाते. सध्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे कांदा बियाणांची विक्री सुरू आहे. मात्र यंदाच्या वर्षी बियाणांच्या उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते आहे. विद्यापीठाने गेल्या वर्षी (२०२३-२४) १४ टन कांदा बियाणे उत्पादित केले होते. यंदा विद्यापीठाकडे ११ टन कांदा बियाणे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

# हिवरेबाजार येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड शुभारंभ

## हिवरेबाजारचे पर्यावरण संवर्धनाचे काम दीपस्तंभासारखे - मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** हिवरेबाजार येथे गुरुवार दि.५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी मातृस्मृती वनमंदिर येथे संत श्री.ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२५ वा संजीवन समाधी सोहळा जगद्गुरु श्री.संत तुकोबारायांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती औचित्य साधून एकूण बेरीज १ हजार ४०० देशी वृक्षांची लागवड शुभारंभ आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. दिनांक ०५ जून ते ०५ जुलै या कालावधीत विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

याप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, हिवरे बाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली सन १९८९ पासून १० लाख वृक्षांची लागवड करून संवर्धन करण्यात आले असून आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केलेली वृक्ष लागवड हे पर्यावरण संवर्धनाचे दृष्टीने दीपस्तंभासारखे आहे असे उद्गार आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी काढले.

याप्रसंगी बोलताना आनंद भंडारी म्हणाले, जागतिक तापमानवाढीची समस्या संपूर्ण जगाला भेडसावत असून परिणामी हिमशिखरे वितळणे समुद्राकाठची शहरे पाण्याखाली जाण्याची शक्यता पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. मी प्रशासकीय सेवेत आल्याबरोबर कामाची सुरवात हिवरे बाजारपासून केली आहे. यापूर्वी हिवरे बाजारला ७ ते ८ वेळा भेट दिली असून हिवरे बाजारमधील झालेली विकासकामे लोकसहभागामुळे अतिशय गुणवत्तापूर्ण झालेली असून इतरांनी येथील विकासकामांच्या गुणवत्तेचा आदर्श घेण्याची गरज आहे.

गावासाठी आदर्शवत विकास कामे झालेली विकासकामातील सातत्यामुळे हिवरे बाजार हे विकासकामांची ग्रामपंढरी आहे. माझ्या २२ वर्षाच्या प्रशासकीय सेवेमध्ये हिवरे बाजारने ग्रामविकासाला दिशा दिलेली आहे.

पुढे बोलताना आनंद भंडारी म्हणाले, केंद्रसरकारच्या मिशन लाईफ या प्रकल्पाची सुरुवात हिवरे बाजार मध्ये करण्यात यावी. सध्या निसर्गाच्या शोषणामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण वाढत आहे त्यासाठी कार्बन क्रेडीट संकल्पना राबविली पाहिजे. विजेचा कमीत कमी वापर करूनअनावश्यक वेळी लाईट बंद करण्यात आली पाहिजे.

राष्ट्रीय स्तरावरील अनेक धोरणात्मक बैठकीत पद्मश्री पोपटराव पवार यांच्या समवेत निर्णय घ्यायला मिळाला त्यामुळेच हिवरे बाजारचे प्रतिबिंब देशभर पहायला मिळाले. निश्चितपणे अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामविकासात हिवरे बाजारचे अतिशय मोलाचे योगदान आहे.

# सण, उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करा - जिल्हाधिकारी गौडा




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** जिल्ह्यात ०७ जून २०२५ रोजी बकर ईद हा सण साजरा करण्यात येणार आहे. चंद्रपूर हा शांतताप्रिय जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्याचा हा नावलौकिक कायम राहावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी सर्वांनी शांततेत सण, उत्सव साजरे करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले. जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागाच्या वतीने नियोजन सभागृह येथे जिल्हा शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक, मुख्याधिकारी, पोलिस पाटील तसेच शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. शांतता समितीमध्ये ज्येष्ठ सदस्यांचा समावेश आहे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आजची तरुण पिढी अनिर्बंधपणे सोशल मिडीयाचा वापर करतात. कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे (एआय) त्यात भर पडल्याचे चित्र आहे. त्यामुळे आपापल्या परिसरातील तरुण पिढीला शांतता समितीच्या सदस्यांनी समजावून सांगावे. आपल्या पोस्टमुळे काही अघटीत घडणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी. कुर्बाणीचे फोटो सोशल मीडियावर अपलोड करू नये. त्यामुळे सर्वांनी जबाबदारीचे भान ठेवावे. सोशल मिडीया संदर्भात काही शंका आल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे किंवा ११२ वर कॉल करून माहिती द्यावी. सणांच्या कालावधीत नियमित पाणी पुरवठा आणि वीज पुरवठा होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी योग्य नियोजन करावे. वीज पुरवठा खंडीत होणार नाही, याची काळजी घ्यावी. बकरी ईदच्या कालावधीत कुर्बाणी झाल्यानंतर अनावश्यक असलेले पदार्थ/ साहित्यांची योग्यप्रकारे विल्हेवाट लावावी, जेणेकरून कोणचाही आक्षेप येणार नाही. तसेच कोणीही कायदा हातात घेऊ नये, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या. यावेळी पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

अशा आहेत सदस्यांच्या सुचना : –यावेळी जिल्हा शांतता समितीच्या सदस्यांनी आपले म्हणणे मांडले. सद्या सणासुदीच्या दिवसात नियमित पाणी पुरवठा व्हावा, वीज पुरवठा खंडीत होऊ नये, कुर्बाणीमुळे कोणालाही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अफवांवर वेळीच निर्बंध घालावे, उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या कत्तलखान्यात लाईट आणि पाण्याची व्यवस्था चांगली असावी. मांसची वाहतूक उघडपणे न करता ती झाकून करावी, आदी सूचना सदस्यांनी मांडल्या.

# मिठी नदीचा गाळ दिव्यात टाकण्यास सुरुवात; उबाठा गटाकडून आयुक्तांना निवेदन





श्री. सचिन राम पाटील
शहरप्रमुख - दिवा शहर
शिवसेना

प्रति,
मा. श्री. आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,
ठाणे

सप्रेम नमस्कार जय महाराष्ट्र!
विषय: मिठी नदीचा गाळ दिवा- मुंब्रात टाकण्यास हरकत असल्या बाबत....

माननीय महोदय,

दिनांक १/६/२०२५ रोजी काही वृत्तपत्रात मिठी नदीचा गाळ दिवा-मुंब्यात टाकण्यात येणार आहे असे प्रसिद्ध झाले होते. दिवा शहरात अगोदरच चुव्हा ब्रिज (दिवा- मुंब्रा मध्ये) येथे होत असलेल्या छुप्या पद्धतीने अनधिकृत डंपिंगच्या दुर्गंधी मुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यात मुंबईतल्या मिठी नदीचा गाळ येथे टाकल्यास दिवा शहरातील नागरिकांच्या रागाचा उद्रेक होईल. तरी प्रशासनाला विनंती आहे, नागरिकांच्या भावनांचा विचार करून हा गाळ येथे टाकू नये. टाकल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. कळावे.

आपला नम्र
सचिन राम पाटील
शहर प्रमुख

प्रत रवाना: मा. श्री. सहाय्यक आयुक्त, दिवा प्रभाग समिती, ठा.म.पा.

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, दिवा (ठाणे) :** दिनांक ०१ जून २०२५ रोजी काही वृत्तपत्रात मिठी नदीचा गाळ दिवा-मुंब्यात टाकण्यात येणार आहे असे प्रसिद्ध झाले होते.

दिवा शहरात अगोदरच चुव्हा ब्रिज (दिवा- मुंब्रा मध्ये) येथे होत असलेल्या छुप्या पद्धतीने अनधिकृत डंपिंगच्या दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यात मुंबईतल्या मिठी नदीचा गाळ येथे टाकल्यास दिवा शहरातील नागरिकांच्या रागाचा उद्रेक होईल. अशी प्रशासनाला उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून निवेदनातून विनंती करण्यात आली आहे. नागरिकांच्या भावनांचा विचार करून हा गाळ येथे टाकू नये. टाकल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा गटाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा दिवा शहर प्रमुख सचिन पाटील यांनी ठाणे आयुक्त, दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांना निवेदनात दिला आहे.

# थोडक्यात

## तृतीयपंथी नागरिकांचा ही प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती मोहीमेत सक्रिय सहभाग



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्लास्टिक निर्मूलनासाठी विविध मोहीम हाती घेण्यात येत असून त्यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात आहे व विविध उपक्रमांना नागरिकांचा उत्तम सहभाग लाभत आहे. या अनुषंगाने गुरुवार, दिनांक ०५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वदिवशी प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करा अशा संदेश प्रसारणासाठी सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रांतील मोठ्या मार्केट्समध्ये विक्रेते व ग्राहक असणाऱ्या नागरिकांमध्ये प्लास्टिक न वापरण्याविषयी जनजागृती तसेच कापडी पिशव्यांचे वाटप असा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात आला.

यामध्ये वाशी विभागातील उपक्रमात विशेष म्हणजे तृतीयपंथी नागरिकांनी प्लास्टिकला नकार मोहीमेत सक्रिय सहभागी घेतला. सेक्टर ९ येथील भाजी मार्केटमध्ये त्यांनी दुकानदार व नागरिकांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे यावेळी नागरिकांना कापडी पिशव्यांचे विनामूल्य वाटप करण्यात आले. या उपक्रम आयोजनात लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख रिचा समित तसेच किन्नर मां सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेतला. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, वाशी विभागाचे सहा. आयुक्त सुखदेव येडवे यांच्या माध्यमातून मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ आणि वाशी विभागातील कर्मचाऱ्यांनी सहभागी होत ही मोहीम यशस्वी केली. नवी मुंबईतील विविध उपक्रमांत तृतीयपंथी नागरिकही उत्साहाने सहभागी होत शहराप्रती असलेली आपली आपुलकी आणि कर्तव्य प्रकट करीत असतात.


## केडीएमसी माध्यमातून ३ हजार झाडांचे वृक्षारोपण



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, कल्याण :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) तर्फे विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत उंबरडे अमृतवन येथे गुरुवार, दिनांक ०५ जून २०२५ रोजी ३ हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले असून, याचे उद्घाटन केडीएमसीचे आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात विविध शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच स्थानिक आमदार, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. वृक्षारोपणासाठी शहरातील उंबरडे अमृतवन या ठिकाणची निवड करण्यात आली. यावेळी बोलताना आयुक्त अभिनव गोयल म्हणाले, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण हा अत्यंत महत्त्वाचा उपाय आहे. केडीएमसीच्या वतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाते आणि यावर्षी आपण ३ हजार झाडे लावून एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. केडीएमसी प्रशासनाने या झाडांच्या देखभालीसाठी विशेष कार्यसंघ ही तयार केला असून पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी पुढे यावे आणि अधिकाधिक झाडे लावावीत, असे आवाहन ही यावेळी करण्यात आले.

## ड्रॅगन बोट खेळाच्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता जिल्हा संघ निवड चाचणीचे आयोजन



ड्रॅगन बोट आणि ट्रेडिशनल वॉटर स्पोर्ट्स असोसिएशन ता.जि.धाराशिव

प्रति,
मा.संपादक
दै.सामना

विषय :- ड्रॅगन बोट खेळाच्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता जिल्हा संघ निवड चाचणीची बातमी प्रसिद्ध करणे बाबत...

महोदय,

बातमीचे स्वरूप खालीलप्रमाणे
ड्रॅगन बोट खेळाच्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता जिल्हा संघ निवड चाचणी आयोजन

आपला विश्वासु
सचिव
धाराशिव जिल्हा ड्रॅगन बोट आणि ट्रेडिशनल वाटर स्पोर्ट असोसिएशन धाराशिव

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०५, धाराशिव :** धाराशिव जिल्हा ड्रॅगन बोट आणि ट्रॅडिशनल वाटर स्पोर्ट असोसिएशन धाराशिव च्या वतीने ०६ ते ०८ जून २०२५ रोजी दरम्यान होणाऱ्या पहिल्या सिनियर पुरुष व महिला राज्यस्तरीय ड्रॅगन बोट अजिंक्य पद स्पर्धा२०२४- २५करिता ड्रॅगन बोट खेळाचे जिल्हा स्तरीय निवड चाचणीचे आयोजन उषा बालाजी क्षीरसागर इरला तालुका धाराशिव येथे दिनांक ०५ जून रोजी आयोजित करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे जाहीर आवाहन जिल्हा संघटना अध्यक्ष व सचिव यांच्यावतीने करण्यात येत आहे.

## श्री शिवाजी विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालूक्यातील रांजणगाव मशिद येथील श्री शिवाजी विद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने युवा उद्योजक विक्रमशेट गाढवे यांनी निसर्गाचे संतुलन राखण्याची आज काळाची गरज आहे. हा हेतू काही अंशाने सिध्द होण्याच्या हेतुने विद्यालयास वृक्ष देणगी म्हणून दिले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने विद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी गावातून प्रबोधन फेरी काढण्यात आली.

त्यानिमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी प्ल्यास्टिक बंदीचे निवेदन तयार करुन गावचे विद्यामान सरपंच महेश देशमुख यांना देण्यात आले. प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम काय होतात. त्या विषयी विद्यालयाचे प्राचार्य विलास टोणगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जागतीक पर्यावरणाचे औचित्य साधुन विद्यालयाचे सर्व विद्यार्थ्यांना प्लास्टीक पिशव्याची होळी करुन आज पासुन प्लास्टिक वापरणार नाही. अशी सर्वांनी प्रतिज्ञा घेतली.